# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १७३-२३** **दिनांक ०१/०६/२०२३**

**खुनाच्या गुन्हयामध्ये फाशीची शिक्षा रदद करुन २५ वर्ष तुरुंगवास भोगत असलेला व जेलमधुन ०२ वर्ष परागंदा झालेल्या आरोपीतास अटक - वालीव पोलीस ठाणेची कामगिरी.**

माणिपुर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्यादी बालन राघवन कणकरा, रा. अंधेरी पुर्व, मुंबई यांनी फिर्यादी यांचे नातेवाईक प्रभु कृष्णन नोचल यांनी आरोपीत दिलीप प्रेमनारायण तिवारी यांची बहीण हीचे सोबत प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरुन वर नमुद अरोपी व त्याचे साथीदारांनी प्रभु नोचल व त्याचे तीन नातेवाईक यांना ते राहत असलेल्या खैरपाडा, वसई पुर्व येथे घरात घुसुन जिवे ठार मारले होते. सदरबाबत वर नमुद फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं १४४/२००४ भा.दं.वि.सं. कलम ३०२, ३०७, ४५२, ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

दिनांक ०६/०८/२०२० रोजी मध्यवर्ती कारागृह कळंबा, जि.कोल्हापुर येथे आरोपीत दिलीप प्रेमनारायण तिवारी रा. ग्राम/पोस्ट बिजुरी, ता. बेंदकी, जि. फत्तेपुर राज्य उत्तरप्रदेश यास कोरोना महामारीमुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार पॅरोल रजेवर तुरुंग अधिक्षक यांनी रजेवर मुक्त केले होते. त्यास दिनांक २७/०५/२०२२ चे पुर्वी हजर होणे आवश्यक होते. वर नमुद आरोपीत याने हजर न होता तो फरार झालेला होता. त्यामुळे दिनांक १८/०६/२०२२ रोजी आरोपीताविरुद पो.हवा. जितेंद्र प्रभाकर बांदल नेम. कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीताविरुध्द वालीव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं ६१३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम २२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद आरोपीताचा शोध घेणेबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते. सदरबाबत वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी उत्तरप्रदेश पोलीस व अरोपीताचे नातेवाईक यांचेकडुन माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला परंतु कोणतीही उपयुक्त माहिती मिळाली नाही. गुन्हयाचा तपास करणारे पो.उप.नि. अतुल नावले व स्टाफ यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली कि, वर नमुद गुन्हयांतील आरोपी हा पुणे जिल्हयातील भोसरी येथे येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने सापळा कारवाई करुन वर नमुद आरोपीतास दिनांक ०१/०६/२०२३ रोजी ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री. विनायक नरळे, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.उप.नि. अतुल नावले, पो.हवा. मुकेश पवार, किरण म्हात्रे, मनोज मोरे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, विशाल निंबाळकर, बाळु कुटे, पो.अंम. अभिजीत गढरी यांनी केली आहे.




----ooo----